पनवेल (प्रतिनिधी) पनवेलमधील क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाच्या उदघाटनानंतर पहिला प्रयोग म्हणून श्रीधर फडके यांच्या 'गीतरामायण' या कार्यक्रमाचे आयोजन नगरपालिका व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. या नाटयगृहातील पहिल्या प्रयोगाचे उदघाटन कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या हस्ते व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि.०१)करण्यात आले.

यावेळी कविवर्य मंगेश पाडगावकर यांच्या हस्ते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून वस्त्रहरणकार गंगाराम गवाणकर, कवी मंगेश विश्वासराव, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष मुश्ताक अंतुले, आमदार प्रशांत ठाकूर, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष आर.सी.घरत, तालुकाध्यक्ष लक्ष्मणशेठ पाटील, ज्येष्ठ नेते डॉ.भक्तीकुमार दवे, इंटकचे प्रदेश कार्याध्यक्ष महेंद्र घरत, नगराध्यक्षा चारूशिला घरत, उपनगराध्यक्ष मदन कोळी, मुख्याधिकारी डॉ.सुधाकर जगताप, माजी नगराध्यक्ष व्दारकानाथ भगत, शहर कॉंग्रेसचे अध्यक्ष जयंत पगडे, प्रवक्ते वाय.टी.देशमुख, शशिकांत बांदोडकर, गटनेते अनिल भगत, यांच्यासह नगरसेवक आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी श्रीधर फडके म्हणाले की, कविश्रेष्ठ ग.दि.माडगूळकर यांच्या लेखणीतून उतरलेले आणि सुधीर फडके यांनी संगीतबध्द केलेले आणि त्यांच्याच सुमधूर आवाजातून अख्ख्या महाराष्ट्राला भारावून सोडणाऱ्या 'गीतरामायण' ने आता ६० व्या वर्षात पदार्पण केले आहे. ६० व्या वर्षातील पहिल्या कार्यक्रमाचा पहिला मान पनवेलकरांना मिळाला, याचे सारे श्रेय आयोजकांना जाते. कुठलीही व्यक्ती, कुठलाही समाज किंवा कुठलेली राष्ट्र असले तरी त्याला मार्गदर्शन करण्याची, सन्मार्गी आणण्याची शक्ती या महाकाव्यात आहे. सद्यस्थितीत जास्तीत जास्त लोकापर्यंत ही गीते पोहोचवण्याची गरज आहे असे सांगून ६० व्या वर्षात ६० कार्य क्रम करण्याचा मनोदयही फडके यांनी बोलताना व्यक्त केला. तत्पूर्वी श्रीधर फडके यांनी गायलेल्या 'गीतरामायण' मधील ५६ गीतांनी नवीन नाटयगृहातील प्रत्येक जण प्रफुल्लित झाला. 'राम जन्मला गं सखे राम जन्मला', 'सेतू बांधा रे', 'स्वयं श्री राम प्रभू ऐकती', यांसारख्या गीतांमध्ये रसिकांनी सूर मिसळला. या कार्य क्रमाचे निवेदन धनश्री लेले तर सुत्रसंचालन कॉंग्रेसच्या विचार विभागाचे जिल्हाध्यक्ष कांतीलाल कडू यांनी केले.